# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल – ४१० २०६.


दुरध्वनी कार्यालय : ०२२ – २७४५८०४०/४१/४२
फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२ – २७४५५७५१
आयुक्त कार्यालय : ०२२ – २७४५२३३९
ई-मेल : panvelcorportation@gmail.com
वेबसाईट : www.panvelcorporation.com


## : जाहीर निविदा सुचना :

पनवेल महानगरपालिकेतील सफाई कामगार, मुकादम, मजुर व स्वच्छता निरिक्षक व इतर कर्मचारी यांस पावसाळी प्रावरणे उपलब्ध करुन देणे बाबत पात्र व इच्छुक ठेकेदार/ पुरवठाधारक अधिकृत विक्रेते यांच्या कडून सदर कामी कोरी निविदा पत्र www.panvelcorporation.com या संकेत स्थळावर दिनांक : १९ / ०६ /२०२३ ते दिनांक : २७ / ०६ /२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या निविदा दिनांक : २८ / ०६ /२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा धारकाने साहित्याचे दर प्रमाणक याची माहिती मनपा ने विहित केलेल्या नमुन्या रकान्यात भरणे आवश्यक आहे. सदरहु कामाचा तपशिल खालीलप्रमाणे :

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत (Estimate Cost) | EMD | निविदापत्रकाची किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिकेतील सफाई कामगार, मुकादम, मजुर व स्वच्छता निरिक्षक व इतर कर्मचारी यांस पावसाळी प्रावरणे उपलब्ध करुन देणे बाबत. | ४,९०,२५०/- | ५०००/- | ५०० + १८% GST = रु. ५९०/- मात्र |

(डॉ. प्रशांत रसाळ)
**अतिरिक्त आयुक्त**
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/भांडार/ ४८२३ / प्र.क्र. १ / ४९८ /२०२३

दिनांक १६ / ०६ /२०२३

# पनवेल महानगरपालिका

## ता.पनवेल, जि. रायगड ४१० २०६

# निविदा पत्रकाविषयी नियम व अटी शर्ती

१. निविदापत्रका संबंधीची सविस्तर माहिती विनामुल्य कार्यालयीन वेळेत मनपाचे भांडार विभागात मिळेल

२. अनामत रक्केमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र..१ मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

३. निविदाधारकांनी निविदा फॉर्म भरताना दोन लिफाफा पध्दतीने खालीलप्रमाणे कराव्यात.

**अ) लिफाफा क्र.०१ मध्ये खालील कागदपत्रांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

- दुकान नोंदणी प्रमाणपत्र.
- पॅन कार्ड, जी. एस.टी रजिस्टेशन सर्टिफीकेक्ट
- शासकीय व निमशासकीय कार्यालयात संबंधित कामा बाबतचा कमीतकमी ४ लाखा पर्यंत अनुभव दाखला जोडणे आवश्यक
- शासकीय व निमशासकीय काळ्या यादीत समाविष्ट केले नसल्या बाबतचे स्वयंघोषणा पत्र.

**ब) लिफाफा क्र. ०२ मध्ये निविदापत्रक दरसुची अटी व शर्ती सह सादर करणे.**

१. प्राप्त निविदातील एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क महापालिकेने रोखुन ठेवला आहे

२. सदर निविदा अंतिम कालवधीच्या अगोदर भांडार विभागात नमूद साहित्याचे नमुने सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदरकालवधीत प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात येतील.

३. कार्यादेशात नमुद केलेले एकाचवेळी व एकत्रितरित्या महानगरपालिका निर्देश देईल त्या ठिकाणी वेळेवर पोहच करणे आवश्यक आहे. सदर कामी वाहतूकीची जबाबदारी संपूणपणे पुरवठाधारकाची राहील या साठी महापालिकामार्फत कोणतेही ज्यादा शुल्क अदा करण्यात येणार नाही.

४. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतुन माघार घेतल्यास त्यांची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

५. ज्या निविदाधारकाची निविदा मंजुर करण्यात येईल. त्या निविदाधारकाने योग्य त्या रक्कमेचे मुद्रांक शुल्कावर पालिकेने विहित केलेल्या नमुन्यात करारनामा करुन देऊन, करारनाम्यातील

अटी व शर्तीनुसार पालिकेचे मागणीपत्रात नमुद केलेले साहित्याचा पुरवठा आदेश मिळलेपासुन ७ दिवसांचे आंत महापालिकेस करणेचा आहे.

६. पुरविणेंत आलेले साहित्य हे निकृष्ट दर्जाचे असल्यास ती स्वखर्चाने त्वरीत बदलुन देणेची जबाबदारी संबंधित पुरवठा धारकावर राहिल. नियमाप्रमाणे सदरहु साहित्याची देयके मंजुर दरानुसार महापालिकेची आर्थिक परिस्थितीनुसार अदा करणेंत येतील.

७. नियमाप्रमाणे सदरहु साहित्याची देयके मंजुर दरानुसार अदा करणेंत येतील व आवश्यक शासकीय कपाती देयकातून वसुल करण्यात येतील.

८. संबधित पुरवठाधारकाने सदरहु साहित्याचा विहीत मुदतीत पनवेल महापालिकेस पुरवठा न केल्यास/वा अर्धवट पुरवठा केल्यास अथवा महापालिकेने सांगितलेले कामे विहित मुद्दतीत न केल्यास सदरचे काम महापालिकेस इतर संस्था /पुरवठा धारकाकडुन करुन घ्यावे लागल्यास जो खर्च होईल त्याचे दुप्पट खर्च सदरचे निविदा धारकाकडून वसुल केला जाईल . सदरची रक्कम संबंधित पुरवठा धारकास देय असलेल्या बिलाचे अथवा अनामत रक्कमेमधुन कपात करुन वा अन्य कायदेशीर बाबींचा अवलंब करुन वसूल करुन घेणेचा अधिकार पनवेल महानगरपालिकेस यांना राहिल

९. सदरहुं कामासंबंधी शासकीय लेखा परिक्षणात अथवा अन्य कोणत्याही प्रकारची वसुली निघाल्यास ती संबंधित पुरवठाधारकाने पनवेल महानगरपालिकेकडे विनाहरकत भरणा करणेची आहे व सदरची रक्कम सुध्दा संबंधित पुरवठाधारक यांना देय असलेल्या बिलांचे अथवा अनामत रक्कमे मधुन कपात करुन वा अन्य कायदेशीर बाबींचा अवलंब करुन वसुल करुन घेणेचा अधिकार पनवेल महानगरपालिका यांना राहाणार आहे. कार्यादेशात नमुद केलेले सर्व साहित्य एकाचवेळी व एकत्रितरित्त्या पोहच करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. वेगवगळे साहित्य या कार्यालयाकडुन स्विकारले जाणार नाही.

१०. L१ यांनी काम करणेस असमर्थता व्यक्त केलेस EMD जप्त करुन पुढील एक वर्षासाठी काळ्या यादीत समाविष्ट करणेत येईल.

प्रति,
अतिरिक्त आयुक्त ,
पनवेल महानगरपालिका यांस

निविदेचे सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मी सर्व माहिती घेवुनच हे निविदा पत्रक भरले आहे. निविदा मंजुर झाल्यास महापालिकेच्या मागणीप्रमाणे सर्व मालाचा पुरवठा करण्यात येईल तसेच निविदेचे अटी व शर्ती मला / आम्हास बंधनकारक आहेत.

दिनांक / / २०२३

निविदा धारकाची स्वाक्षरी